# मुंबई विद्यापीठ

क्र.पदवीपुर्व/ ५७ /२०१९-२०

परिपत्रक:-

मुंबई विद्यापीठाच्या विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक यांना मराठी विषयातील तृतीयवर्ष बी. ए. शिक्षणक्रमामधील सत्र क्रं. ५ व क्रं. ६ बाबत सुधारीत अभ्यासक्रमाबाबत परिपत्रक क्र.युजी/१०/२०१८-१९, दिनांक १४ जून, २०१८ निर्गमित करण्यात आलेले होते.

"मुंबई विद्यापीठाच्या तृतीयवर्ष बी. ए. शिक्षणक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०१८-१९ सत्र क्रं. ५ अभ्यासपत्रिका क्रं. ६ करिता 'साहित्य आणि समाज' अंतर्गत महानगरीय साहित्य प्रवाहाकरिता दिनकर मनवर यांचा 'दुश्य नसलेल्या दृश्यात' हा कवितासंग्रह नेमण्यात आला होता. सदर कवितासंग्रहातील पृष्ठ क्रं. १२ आणि १३ वरिल 'पाणी कसं असतं' ही कविता अभ्यासक्रमातून वगळण्यात आली आहे. या कवितेचे अध्यापन केले जाणार नाही, तसेच त्याबाबत कोणताही प्रश्न परीक्षेसाठी विचारला जाणार नाही". सदर ठराव मानवविज्ञान विद्याशाखा अंतर्गत येणा-या मराठी अभ्यास मंडळाच्या दिनांक २९ सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या विशेष बैठकीत सर्वानुमते पारीत करण्यात आला. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम १२(७) मधील तरतुदी नुसार परिपत्रक क्र. युजी/११८/२०१८, दिनांक २९ सप्टेंबर, २०१८ रोजी परिपत्रक निर्गमित केलेले आहे.

सदर बाबतच्या परिपत्रकास दिनांक २६ डिसेंबर, २०१८ रोजी झालेल्या विव्दत परिषदेच्या सभेत बाब क्र. ४.२० अन्वये कार्योत्तर मंजुरी देण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक मुंबई विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

मुंबई ४०० ०३२
दि.१२ जुलै, २०१९

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

प्रति,

मुंबई विद्यापीठाच्या विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक.

******

क्र.युजी/ ५७ /२०१९-२० मुंबई -४०००३२ १२ जुलै, २०१९

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता करिता रवाना:-

१. अधिष्ठाता, मानव विज्ञान विद्याशाखा,
२. अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ,
३. संचालक, विद्यार्थी विकास मंडळ,
४. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ,
५. समन्वयक, विद्यापीठ संगणक केंद्र,

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव